**कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना**


महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २६८ /२०२४ दि. १८/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**संदर्भ** :– 1) MSRDC/02/JMD(ENGG-1)/BKSP/Six Lanning/palava flyover/F.No.204/8337, Date -14/11/2022.
2) कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे जा.क्र.१००५/२०२४, दि. १६/११/२०२४.

*******

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **कोळसेवाडी** वाहतूक उपविभागाचे हद्दीमध्ये महाराट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई यांचे प्राप्त पत्रानुसार लोढा पलावा जंक्शन, डोंबिवली, कल्याण पुर्व येथे देसाई खाडी ते काटई गाव येथे दोन्ही वाहीनीवर नवीन उड्डाणपूल निर्माण करण्याचे काम चालू आहे. लोढा पलावा जंक्शन कडून काटई चौक कडे जाताना निळजे रल्वे ब्रिजचे अलीकडे व निळजे रेल्वे ब्रिज पलीकडे एकूण ७ (सात) सिमेंट गर्डर व काटई चौक कडून शिळफाटा कडे जाणाऱ्या वाहीनीवर लोढा पलावा जंक्शन येथे कासा रिओ कट ते देसाई खाडी ब्रिज दरम्यान १२ सिमेंट गर्डर पीलरवरती मोठे क्रेनचे साहाय्याने ठेवण्याचे काम करणार आहेत. सदरचे काम दि. १९/११/२०२४ ते दि. २६/११/२०२४ रोजी पावेतो कल्याण कडून लोढा पलावाकडे जाणाऱ्या वाहीनीवर होणार आहे व दिनांक २७/११/२०२४ ते दिनांक ०२/१२/२०२४ रोजी पावेतो कल्याणफाटा, मुंब्रा कडून कल्याण कडे येणाऱ्या वाहीनीवर असे दोन टप्यात रात्री ११:०० ते सकाळी ०६:०० वाजेचे दरम्यान चालणार आहे. त्याकरीता दररोज रात्रौ २२:०० वा. ते सकाळी ०६:०० वाजेचे दरम्यान कामाचे स्वरूपानुसार एकाच वाहीनीवरून (रस्त्यावरून) वाहतूक सुरू ठेवावी लागणार आहे त्याकरीता देसाई नाका व काटई गॅप येथून वाहतूक वळविणे आवश्यक असल्याने सदर कालावधीत परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंब्रा, कल्याण फाटा कडून कल्याण कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **कल्याण फाटा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने कल्याण फाटा–मुंब्रा बायपास–खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) कल्याण कडून मुंब्रा कल्याण फाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना **काटई चौक (बदलापूर चौक)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची जड अवजड वाहने काटई चौक (बदलापूर चौक) –खोणी नाका–तळोजा एमआयडीसी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना खालील नमूद कालावधी दरम्यान गर्डर टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

१) दि.१९/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२०/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
२) दि.२०/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२१/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
३) दि.२१/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२२/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
४) दि.२२/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२३/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
५) दि.२३/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२४/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
६) दि.२४/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२५/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
७) दि.२५/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२६/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
८) दि.२६/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२७/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
९) दि.२७/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२८/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
१०) दि.२८/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.२९/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
११) दि.२९/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.३०/११/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
१२) दि.३०/११/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.०१/१२/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत
१३) दि.०१/१२/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.०२/१२/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत

CamScanner

१४) दि.०२/१२/२०२४ रोजी रात्रो २३:०० वा ते दि.०३/१२/२०२४ रोजी सकाळी ०६:०० वाजे पर्यंत

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, नवी मुंबई महानगरपालिका.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे/कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण,
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर.
ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर.
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– संबंधित सहायक पोलीस आयुक्त, वाहतूक विभाग,ठाणे शहर/संबंधित पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा. कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner